


# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक २८८, शनिवार ३ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बाळासाहेब थोरातांच्या व्यासपीठावर राजेंद्र पिपाडा!

## राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या

शिर्डी :प्रतिनिधी

**शिर्डी विधानसभा मतदारसंघात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे पक्षांतर्गत विरोधक समजले जाणारे भाजपचे नेते राजेंद्र पिपाडा काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यासोबत काँग्रेसच्या व्यासपीठावर दिसले. त्यामुळे राजकीय क्षेत्रातील अनेकांच्या भुवया उंचावल्या असून विविध चर्चांना उधाण आले आहे. शिर्डी मतदारसंघात भाजपाने उमेदवारी देताना विचार करावा असे वक्तव्य राजेंद्र पिपाडा यांनी दोन दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर ते काँग्रेसच्या व्यासपीठावर दिसल्याने पिपाडांच्या मनात चाललंय तरी काय? असाच प्रश्न अनेकांना पडलाय.**



राजेंद्र पिपाडा शिर्डीतील भाजपचे नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. भाजपकडे उमेदवारीची मागणी केल्यानंतर आज ते थोरात यांच्या समवेत दिसले. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील आश्वी गावात महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित खासदार निलेश लंके आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आलाय. या सत्कार समारंभाला राजेंद्र पिपाडाही पोहोचले. पिपाडा भाजपची साथ सोडणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

**कोण आहेत राजेंद्र पिपाडा?**

राजेंद्र पिपाडा हे पेश्याने होमिओपॅथिक डॉक्टर असून गेल्या २५ वर्षांपासून सामजिक कार्यात आहे. २००९ च्या विधानसभेत त्यावेळी काँग्रेस आघाडीचे उमेदवार राधाकृष्ण विखे पाटील यांना शिवसेना भाजप युतीकडून टक्कर देणारे अशी त्यांची ओळख आहे. राजेंद्र पिपाडा २००१ ते ०६ आणि २०१६ ते २१ राहाता नगरपालिकेचे नगरसेवक राहिले. त्यांच्या पत्नी ममता पिपाडा २००१ ते ०६ आणि २०१६ ते २१ राहाता नगर परिषदेच्या नगराध्यक्षा राहिल्या आहेत. दोन वेळा नगरपरिषद विखेंच्या ताब्यातून त्यांनी स्वतः कडे घेतली आणि त्यांच्या पत्नी ममता पिपाडा नगराध्यक्ष झाल्या होत्या.

२०१४ साली पिपाडा भाजपमध्ये सामील झाले आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती मानले जातात. त्यांनी २०२४ ची विधानसभा निवडणूक भाजपकडून लढवण्याची इच्छा देखील व्यक्त केली आहे.

**सुजय विखेंवर केली होती टीका**

दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत राजेंद्र पिपाडा यांनी माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटलांवर टीका केली होती. विखे पाटील मोक्कातील आरोपींच्या कार्यालयाचे उद्घाटन करत असून आरोपींना पाठबळ देत असल्याचे आरोप करताना त्यांनी संपूर्ण प्रकरण निदर्शनास आणून विखेंवर टीका केली होती.

# अस्तगांवच्या सरपंचांविरोधात अविश्वास ठराव दाखल

## ९ सदस्यांपैकी ७ सदस्य अविश्वास ठरावाच्या बाजूने

अस्तगांव : प्रतिनिधी

**अस्तगांव ग्रामपंचायतीच्या सदस्या लताबाई सुरेश काळे यांच्याविरोधात गुरूवारी ९ पैकी ७ सदस्यांनी तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला. आता येत्या ६ ऑगस्ट रोजी अविश्वास ठरावावर सहया करणाऱ्या सदस्यांची पडताळणी करण्यात येऊन अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी सदस्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.**

अस्तगांव ग्रामपंचायतीचे सदस्य सिमा प्रमोद काळे, सुरेश गोरक्ष काळे, वैभव रावसाहेब काळे, रेष्मा केशव काळे, जालिंदर दत्तात्रेय काळे, संध्या कल्याण काळे, अलका शिवाजी नाणेकर यांनी सरपंच लताबाई काळे यांच्या मनमानी कारभारास कंटाळून तहसिलदारांकडे अविश्वास ठराव दाखल केला.


मिळालेल्या माहीतीनुसार अस्तगांव ग्रामपंचायतीच्या सार्वत्रीक निवडणूकीमध्ये अविश्वास ठराव दाखल करणारे सदस्य तसेच सरपंच लताबाई काळे यांच्या एकत्रीत पॅनलने अस्तगांव ग्रामपंचायतीची सत्ता हस्तगत केली होती. त्यानंतर एकविचाराने लताबाई काळे यांना सरपंचपदाची संधी देण्यात आली.



ग्रामपंचायतीचा कारभार सुरू झाल्यानंतर काळे यांनी कोणत्याही सदस्याला विचारात न घेता अथवा विश्वासात न घेता मनमानी करभार करण्यास सुरूवात केली. विनंती करूनही सरपंच काळे या आपल्या भुमीकेवर ठाम राहिल्याने काळे यांच्या विरोधात सात सदस्यांनी एकत्र येत अविश्वास ठराव दाखल केला. दरम्यान ९ पैकी ७ सदस्य एकत्र आल्याने लताबाई काळे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजुर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सदस्यांच्या पडताळणीनंतर बोलविण्यात येणाऱ्या सदस्यांच्या बैठकीत अविश्वास ठरावाचा फैसला होउन त्यानंतर सरपंचपदावर कोणाची वर्णी लागते याकडे लक्ष लागले आहे.

# मान्सून उर्वरित हंगामात जोरदार बरसणार

## विदर्भासह मध्य महाराष्ट्राची चिंता वाढणार



पुणे :प्रतिनिधी

**नैर्ऋत्य मान्सूनच्या उर्वरित हंगामात (ऑगस्ट, सप्टेंबर) महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवली आहे. ऑगस्टमध्ये विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस होऊ शकतो, असे 'आयएमडी'ने अंदाजात म्हटले आहे.**

संस्थेचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी गुरुवारी मान्सून हंगामाचा उत्तरार्ध आणि ऑगस्ट महिन्याच्या हवामानाचा अंदाज ऑनलाइन पत्रकार परिषदेत जाहीर केला. 'जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी झालेल्या पावसानंतर जुलैमध्ये राज्यासह देशभरात बहुतेक राज्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस नोंदला गेला. आता ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये एकत्रितपणे सर्वसाधारण ते सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता 'आयएमडी'ने वर्तवली आहे.

ऑगस्ट, सप्टेंबरमधील पावसाच्या अंदाजाबाबत डॉ. महापात्रा म्हणाले, 'ईशान्येकडील राज्ये, लडाख आणि गुजरातचा काही भाग वगळता देशाच्या बहुतांश भागांमध्ये मान्सूनच्या उर्वरित हंगामात सरासरीपेक्षा जास्त (दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्क्यांपेक्षा जास्त) पावसाची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये मध्य, पूर्व आणि उत्तर भारतात काही भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता असल्याने सप्टेंबरमध्ये देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होऊ शकतो.'.

**दोन महिन्यांत अधिक पाऊस**

'महाराष्ट्रात आगामी दोन महिन्यांत एकत्रितपणे सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. मात्र, ऑगस्टमध्ये विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि उत्तर कोकणाच्या काही भागांत सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. येत्या आठ ऑगस्टपर्यंत राज्यात पाऊस सक्रिय राहणार असून, त्यानंतरच्या आठवड्यात पावसाचे प्रमाण कमी होण्याचा अंदाज आहे,' असेही डॉ. मृत्युंजय महापात्रा म्हणाले.

**'ला निना' सप्टेंबरमध्ये**

'आयएमडी'सह जगभरातील हवामानशास्त्रीय मॉडेलनुसार प्रशांत महासागरात सध्या न्यूट्रल स्थिती असून, ऑगस्टअखेरीस उर्वरीत पान ३ वर

# संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे

## मराठा आंदोलक पोलिसांच्या ताब्यात

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या निमित्ताने पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या सिल्लोड विधानसभा मतदारसंघात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या कार्यक्रमाला जात असताना सिल्लोड तालुक्याच्या जवळीच असलेल्या भवन या गावातील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवला. या वेळी पोलिसांनी मराठा समाजाच्या या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.**

भवन या गावातील मराठा समाजाच्या नागरिकांनी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. राज्यातील मराठा समाज आरक्षणासाठी आक्रमक झाला असून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सध्या सुरू नसले तरी समाजाच्या वतीने विविध माध्यमातून आपली मागणी मांडण्यात येत आहे. त्यातच आज सिल्लोड तालुक्यातील उर्वरीत पान ३ वर

# जुने, नवे हिशोब चुकते करण्याची तयारी!

## दादा आणि विखेंना धक्का देण्यासाठी शरद पवारांची फिल्डींग

नगर: प्रतिनिधी

**राज्यातील सर्वात मोठा जिल्हा असलेल्या नगरमध्ये विधानसभा निवडणुकीत मुसंडी मारण्यासाठी शरद पवारांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. जिल्ह्यातील १२ पैकी ८ जागांवर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचं लक्ष आहे. याबद्दल शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळकेंनी शरद पवारांशी चर्चा केली आहे.**



आपण विधानसभेच्या आठ जागांवर लढायला हवं असं शरद पवार म्हणाले. त्यामुळे त्या आठ मतदारसंघांमध्ये आमच्या कार्यकर्त्यांनी तयारी सुरु केली आहे, अशी माहिती फाळकेंनी दिली. महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्षांचा विचार करता शरद पवार गट नगरमध्ये सर्वात भक्कम असल्याची पुस्ती त्यांनी जोडली. लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिणमध्ये शरद पवार गटाच्या निलेश लंकेंनी भाजपच्या सुजय विखे पाटील यांचा पराभव केला. महायुती सरकारमध्ये मंत्री असलेल्या राधाकृष्ण विखे पाटलांच्या लेकाला पाणी पाजल्यानं नगरमधील शरद पवार गटाच्या आशा उंचावल्या आहेत.

नगर जिल्ह्यात विखे पाटील कुटुंबाचं वर्चस्व आहे. संस्था, कारखान्यांचं जाळं ही विखे पाटलांची ताकद आहे. पण लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाकडून लढत लंकेंनी विखे पाटलांना धक्का दिला. त्यानंतर आता विधानसभेसाठी शरद पवारांनी आठ जागांवर तयारी सुरु केली आहे. अकोले, नगर शहर, पारनेर, राहुरी, कोपरगाव आणि कर्जत-जामखेड या सहा जागा राष्ट्रवादी काँग्रेसनं २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकल्या होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अकोले, कोपरगाव, नगर शहरचे आमदार अजित पवार गटात गेले. त्यांच्या पराभवासाठी शरद पवारांनी ताकद लावली आहे. २०१९ मध्ये जिंकलेल्या सहा जागांसोबतच श्रीगोंदा आणि शेवगावमध्येही शरद पवारांनी तयारी सुरु केली आहे. मागील निवडणुकीत या जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते.

शरद पवार गट शिर्डीची जागा लढवण्यासही उत्सुक आहे. कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील शिर्डीचे विद्यमान आमदार आहेत. त्यांचा पराभव करुन जुने हिशोब चुकते करण्याचा पवारांचा मानस आहे. तर पक्षफुटीनंतर साथ सोडणाऱ्या आमदारांना धूळ चारुन पुतण्या अजित पवारांना धक्का देण्यासाठीही शरद पवार फिल्डींग लावत आहेत.

# मनोज जरांगेंविरुद्ध जारी केलेले अटक वॉरंट रद्द

## तरी कोर्टाने जरांगेंना सुनावले, नेमकं प्रकरण काय?

पुणे : प्रतिनिधी

**मनोज जरांगे पाटील यांना पुणे कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. मनोज जरांगे यांच्या विरोधातील अटक वॉरंट रद्द करण्यात आले आहे. जरांगे पाटलांनी प्रयोगाचे पैसे न दिल्याप्रकरणी नाट्यनिर्मात्याने जरांगेंविरोधात पोलिसांत धाव घेतली होती. २०१३ मध्ये या प्रकरणाची नोंद झाली आणि त्यानंतर पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले होते. परंतु आता वैद्यकीय अहवालाच्या आधारे कोर्टाने जरांगेंना दिलासा दिला आहे.**

मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एका नाटकाच्या प्रयोगांचं आयोजन केले होते. या प्रयोगाचे नाट्य निर्मात्याला पूर्ण पैसे न दिल्याप्रकरणी संबंधित नाट्यनिर्मात्याने कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता आणि जून महिन्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. ज्याचा खटला सध्या पुणे कोर्टात सुरु आहे. पण याआधी त्यांनी वैद्यकीय



अहवालाचा दाखला देऊन कोर्टात हजर राहिले नव्हते.

मनोज जरांगे पाटील सातत्याने उपोषण करत असल्याने त्यांची प्रकृती खालावली होती. संभाजीनगर येथील गॅलेक्सी रुग्णालयात त्यांच्यावर मूत्रपिंड विकारासंबंधित उपचार सुरु होते. त्यांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्लाही दिला होता. त्यामुळे ते कोर्टात हजर राहू शकले नाहीत. त्यांनी कोर्टाला यासंदर्भात क्षमायाचिका सादर केली होती. दरम्यान त्यांना डॉक्टरांनी प्रवास टाळण्याचे सुचवले असल्याने मनोज जरांगे पाटील यांनी सुनावणीच्या वेळी रुग्णवाहिकेतून कोर्टात हजेरी लावली. मनोज जरांगे पाटील कोर्टासमोर हजर झाले. यासाठी पाटील रात्री २ वाजता पुण्यात दाखल झाले होते. जरांगेंनी वैद्यकीय अहवालाच्या आधारावर कोर्टासमोर अटक वॉरंट रद्द करण्याची मागणी केली होती. कोर्टानेही वैद्यकीय अहवालांच्या आधारे अटक वॉरंट रद्द करून मनोज जरांगे पाटील यांनी मोठा दिलासा दिला आहे.

**न्यायालयाने जरांगेंना सुनावले**

दरम्यान न्यायलयाबाबत व न्यायलायच्या पीठासीन अधिकाऱ्यांबाबत जरांगेंनी आक्षेपार्ह विधान केल्याची बाब सुनावणीवेळी निदर्शनास आणून दिली. आणि न्यायालयाचा पुन्हा अवमान केला जाऊ नये अशी सक्त ताकीद दिली आहे आणि यापुढे जरांगेंनी बोलताना काळजी घ्यावी असेही सुचवले आहे. तर या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ सप्टेंबर रोजी होणार आहे.






निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

# पक्षाघात!



**अर्धांगवायू म्हणजेच पक्षाघात या आजारात माणसाच्या शरीरातील स्नायूंची हालचाल बंद झाल्यामुळे त्याचे अर्धे शरीर लुळे पडते अथवा निकामी होते. मज्जासंस्था ही शरीरातील एक महत्त्वाची यंत्रणा असून, ती मेंदू आणि पाठीच्या कण्यामध्ये असते. मात्र अर्धांगवायू झाल्यास मज्जासंस्था आणि मेंदूच्या कार्यात अडचणी येतात आणि शरीराचा अर्धा भाग अनियंत्रित होतो. स्नायू कमकुवत झाल्यामुळे अर्धांगवायूचा आजार बळावतो आणि स्नायूंची क्षमता पूर्ण कमी होते...**

अर्धांगवायूची लक्षणे शरीरातील कोणत्याही भागावर जाणवू शकतात. बऱ्याचदा यात शरीराचा एक भाग निकामी होतो मात्र काही वेळा दोन्हीकडील भागावरही याचा परिणाम दिसून येतो. काही लोकांना कंबरेखालील भागावर अर्धांगवायूचा परिणाम दिसून येतो. ज्याला पॅराप्लेजिआ असं म्हणतात, तर क्वाड्रिप्लेजिया अर्धांगवायूमध्ये माणसाचे दोन हात आणि दोन पाय निकामी होतात. अपघात, मानसिक धक्का अथवा पाठीच्या कण्यातील दुखापतीमुळे अर्धांगवायू होण्याचे प्रमाण अधिक आहे. अर्धांगवायूचा झटका अचानक येतो यासाठीच प्रत्येकाला अर्धांगवायू लक्षणे आणि अर्धांगवायू घरगुती उपचार याविषयी माहिती असणं गरजेचं आहे.

## अर्धांगवायू लक्षणे


अर्धांगवायू म्हणजे पक्षाघात, ज्यामध्ये शरीरातील काही ठराविक भागातील स्नायूंची हालचाल अचानक मंदावते अथवा बंद होते. यासाठीच जाणून घेऊ या अर्धांगवायूची लक्षणे...

- संवेदना अथवा जाणीव कमी होणे : अर्धांगवायूचा संबंध हा मेंदू आणि मज्जासंस्थेशी असल्यामुळे या आजारातील प्रमुख लक्षण हेच की संवेदना अथवा जाणीव अचानक कमी होते. ज्या भागावर पक्षाघात झाला आहे त्या भागामधील स्नायूंची संवेदना अचानक बंद होते. बऱ्याचदा या आजारात एखाद्याचे अर्धे अथवा संपूर्ण शरीर, हात अथवा पाय असे अवयव निकामी होतात. मात्र जर मेंदूचा अर्धांगवायू म्हणजेच स्ट्रोक झाल्यास हृदयातून मेंदूला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या बंद होतात अथवा फुटतात. ज्यामुळे ती व्यक्ती कोमात जाते अथवा बेशुद्ध होते. मेंदूला लकवा मारल्यामुळे त्या व्यक्तीच्या संपूर्ण शरीराची हालचाल बंद होते. अशा व्यक्तीची जगण्याची शक्यता खूपच कमी असते. योग्य आणि वेळेवर उपचार मिळाल्यास त्या व्यक्तीला जीवदान मिळू शकते. हात, पाय, अर्धे शरीर अशा भागावर अर्धांगवायू झाल्यास उपचार करून त्या व्यक्तीला बरे करता येते. मात्र त्यासाठी शरीरामध्ये होणारे हे बदल पटकन समजणे गरजेचे आहे.
- मानसिक अवस्था बिघडणे : अर्धांगवायूचा झटका येण्याआधी त्या व्यक्तीची मानसिक स्थिती हळूहळू बदलू लागते. जसं की ती व्यक्ती क्षणात विचित्र वागते आणि क्षणात पुन्हा नीट वागू लागते. दैनंदिन कामे करताना त्या व्यक्तीचा गोंधळ उडतो. चक्कर येते अथवा काम करण्याचा कंटाळा येतो. एखादी गोष्ट डबल दिसते अथवा नसलेल्या गोष्टी असल्याचा भ्रम होतो. थोडक्यात अशी मानसिक स्थिती असलेल्या व्यक्तीला अर्धांगवायू होण्याचा धोका जास्त असतो. अर्धांगवायू होण्याचे एक कारण मानसिक ताण असू शकते.
- स्मरणात ठेवणे कठीण जाणे : अर्धांगवायू होण्याआधीचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे स्मरणशक्तीवर परिणाम होणे. जर एखाद्याला सतत कोणतीही गोष्ट आठवणीत ठेवणं कठीण जात असेल, विचार करणं जमत नसेल, बोलताना अडथळा येत असेल, समोरच्या व्यक्तीचे बोलणे समजत नसेल, उच्चार करताना, वाचताना अथवा लिहिताना त्रास होत असेल, स्नायूंची हालचाल योग्य पद्धतीने होत नसेल तर ही लक्षणे अर्धांगवायूची असू शकतात. त्यामुळे अशी लक्षणे आढळल्यास त्या व्यक्तीला त्वरीत वैद्यकीय मदतीची गरज आहे हे ओळखावे.
- श्वसनाचा त्रास होणे अथवा धाप लागणे : मज्जासंस्थेमुळे शरीतातील सर्व क्रियांवर नियंत्रण ठेवले जाते. मात्र जेव्हा या कार्यात बिघाड होतो तेव्हा त्याचा परिणाम इतर अवयवांवर दिसू लागतो. जसं की श्वसन क्रियेत अडथळे अथवा श्वास घेण्यास त्रास जाणवतो. धाप लागणे, श्वास घेता न येणे, तोंडावाटे श्वास घ्यावा लागणे, श्वास घेताना मोठ्याने आवाज येणे, घरघर लागणे, घशात श्वास अडकणे अशी लक्षणे असतील तर त्या व्यक्तीला अर्धांगवायू होण्याची शक्यता असू शकते.
- तीव्र डोकेदुखी : शारीरिक कार्य उत्तम रितीने होण्यासाठी मेंदूला पुरेसा रक्तपुरवठा व्हायला हवा. मात्र जेव्हा मेंदू अथवा मज्जासंस्थेला रक्तपुरवठा होत नाही तेव्हा शारीरिक कार्यात अडथळे निर्माण होतात. रक्तपुरवठा कमी प्रमाणात मिळाल्यास मेंदूला कार्य करणे कठीण जाते. ज्यामुळे तीव्र डोकेदुखीचा त्रास रुग्णाला जाणवतो. अतिदाबामुळे रक्तवाहिनी फुटल्यास अथवा बंद झाल्यास स्ट्रोक येतो आणि त्या व्यक्तीला वैद्यकीय मदत द्यावी लागते. मात्र हा त्रास तात्पुरत्या स्वरुपाचा असेल तर डोकेदुखीनंतर तो पूर्ववत करता येतो. यासाठीच तीव्र डोकेदुखी जाणवल्यास त्वरीत वैद्यकीय मदत घ्यावी.

## अचानक मूड अथवा व्यक्तिमत्त्व बदलणे

मानसिक स्थितीवर मेंदू आणि मज्जा संस्थेद्वारा नियंत्रण ठेवले जाते. मात्र अर्धांगवायूमध्ये मज्जासंस्थेवरील नियंत्रण सुटल्यामुळे सर्व शारीरिक आणि मानसिक क्रिया बिघडतात. ज्यामुळे माणसाच्या वागण्या बोलण्यावरचा ताबा जातो. म्हणूनच अर्धांगवायूचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण हे की त्या व्यक्तीचा अचानक मूड बदलतो आणि ती व्यक्ती एखादी वेगळं व्यक्तिमत्त्व असल्याप्रमाणे वागू लागते.

- शरीरावरील नियंत्रण जाणे : मेंदूवरील अनियंत्रणामुळे शारीरिक हालचालीवर ताबा ठेवणे कठीण जाते. ज्यामुळे त्या व्यक्तीचे हात, पाय, शरीर अनियंत्रित होते. अंग थरथरणे, हात अथवा पाय लुळे पडणे, अंगाचा तोल जाणे, बसणे अथवा उभे राहता न येणे, चेहरा वाकडा होणे, बोलताना अडथळे येणे, हालचाल करता न येणे अशी लक्षणे जाणवत असतील तर त्या व्यक्तीला अर्धांगवायू झाला असून, त्वरीत वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न करावा.
- सतत तोंडातून लाळ गळणे : जिभेतून सतत लाळ निर्माण केली जात असते. कारण तोंडात लाळग्रंथी असतात जे लाळेची निर्मिती करत असतात. तोंडावाटे निर्माण झालेल्या लाळेमुळे आपण खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होत असते. तोंडातील आणि जिभेच्या स्नायूंमुळे तोंडात निर्माण होणारी लाळ नियंत्रित ठेवली जाते. शिवाय जेव्हा गरज असते तेव्हाच या लाळेची निर्मिती होत असते. मात्र अर्धांगवायूमुळे तोंड आणि जिभेचे स्नायू निकामी होतात. ज्यामुळे तोंडाचा आकार बदलतो आणि तोंडातून सतत लाळ गळू लागते. यासाठीच अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीच्या तोंडातून लाळ गळत असते.
- अंगाला बधीरपणा येणे : शरीरातील स्नायूंची संवेदना कमी झाल्यामुळे अर्धांगवायूत व्यक्तीचे शरीर लुळे पडते. लकवा आलेल्या अथवा पक्षाघात झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील काही ठराविक अवयवांच्या स्नायूंमध्ये संवेदना नसल्यामुळे त्या भागावर बधीरपणा येतो. अशा व्यक्तीच्या लुळ्या पडलेल्या अवयवाला स्पर्श केल्यास त्याला कोणत्याही संवेदना जाणवत नाहीत. त्यामुळे एखाद्या अवयवाच्या संवेदना कमी झाल्या असतील तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



## अर्धांगवायूबाबत महत्त्वाचे प्रश्न...

- अर्धांगवायूचा झटका आल्यास कोणते उपचार करावे? : अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीला प्रथमोपचार देण्यासाठी आधी त्या व्यक्तीला कुशीवर झोपवावे आणि पुढे वैद्यकीय मदत घ्यावी. त्यामुळे त्या व्यक्तीची श्वसन क्रिया सुरळीत सुरू राहते. लक्षणे तपासून कोणत्या प्रकाराचा अर्धांगवायू झाला आहे याचे निदान करून डॉक्टर त्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार देतात.
- अर्धांगवायू कशामुळे होतो? : अर्धांगवायू होण्याची कारणे अनेक आहेत. मेंदूंचे गंभीर आजार, ऑटोइम्यून विकार, स्ट्रोक, हृदयविकार, विषबाधा अशा कारणांमुळेही अर्धांगवायू होण्याची शक्यता असते. गंभीर स्वरुपाच्या म्हणजेच स्ट्रोक अथवा मानेच्या मणक्याच्या दुखापतीमुळे होणाऱ्या अर्धांगवायूची लक्षणे त्वरीत जाणवतात. अशा परिस्थितीत रुग्णाला ताबडतोब वैद्यकीय मदतीची गरज असते.
- अर्धांगवायूचा धोका कसा कमी करावा? : अर्धांगवायू होऊ नये यासाठी नियमित रक्तदाब, रक्तातील साखर, वजन नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करावा. हृदयविकार असणाऱ्या लोकांनी नियमित तपासणी करावी. योग्य आहार, विहार आणि व्यायामाची सवय स्वतःला लावावी.

## अर्धांगवायू घरगुती उपचार

**अर्धांगवायूचा झटका आलेल्या व्यक्तीला सर्वप्रथम वैद्यकीय उपचार घ्यावेत. मात्र त्यानंतर त्या व्यक्तीचे लुळे पडलेले शरीर मानसिक आधार आणि घरगुती उपचारांनी बरे करता येऊ शकते...**

- मोहरीच्या तेलाने मालिश : लकवा मारलेल्या शरीराला तेलाने मालिश केल्यास काही दिवसांमध्ये त्यामध्ये सुधारणा दिसून येते. यासाठी अर्ध्या लिटर मोहरीच्या तेलात ५० ग्रॅम लसूण टाकून लोखंडी कढईत ते गरम करावे. थंड झाल्यावर तेल गाळून एखाद्या काचेच्या बाटलीत अथवा बरणीत ठेवावे. मोहरीचे तेल आणि लसणाचे मिश्रण अंगाला लावून मालिश केल्यामुळे अर्धांगवायूमध्ये चांगला आराम मिळतो.
- गरम पाणी अन् तुळशीच्या पानांची वाफ : लकवा मारलेल्या व्यक्तीला अर्धांगवायू झालेल्या शरीराला शेक देणं गरजेचं असतं. यासाठी तुम्ही गरम पाण्यात तुळशीची पाने टाकून त्याची वाफ अथवा शेक त्या भागाला देऊ शकता. या वाफेमुळे अंगातील स्नायूंना प्रोत्साहन मिळू शकते. ज्यामुळे पुन्हा त्या व्यक्तीचे अवयव नीट होऊ शकतात. मात्र हा उपचार इतर वैद्यकीय उपचारांसोबत घ्यावा. ज्यामुळे करत असलेल्या उपचारांना प्रोत्साहन मिळू शकते.
- दूध आणि खजूर : दूध आणि खजूर या दोन्हीमध्ये अशक्तपणा दूर करणारे गुणधर्म असतात. हे दोन पदार्थ एकत्र करून रुग्णाला खाण्यास दिल्यामुळे त्याच्या अंगात ताकद येते. लोहाचे प्रमाण वाढण्यासाठी, हाडे मजबूत होण्यासाठी, स्नायूंना बळकटी येण्यासाठी दूध आणि खजूर फायदेशीर ठरतात. यासाठी रोज दूधात काही खजूर भिजवून त्या व्यक्तीला खाण्यास द्यावे.
- काळी मिरी आणि तूपाचा लेप : अर्धांगवायू बरा करण्यासाठी अनेक वेळा आयुर्वेदिक आणि घरगुती उपचार प्रभावी ठरतात. अशा रुग्णांना अर्धांगवायू झालेल्या भागावर लेप लावण्याची पद्धत आहे. यासाठी एक चमचा काळी मिरी वाटून घ्यावी आणि तीन तीन चमचे शूद्ध तूपात मिसळून त्याचा लेप रुग्णाच्या अंगाला लावावा. असा लेप लावून मालिश केल्यामुळे हळू हळू त्या रुग्णाच्या शरीरात प्रगती झालेली दिसून येऊ शकते.

# घनदाट केसांसाठी शाम्पूत हे करा मिक्स!

**प्रत्येक महिलेला वाटतं की आपल्या केसांची मजबूती चांगली असावी आणि आपले केस हे पातळसर न राहता घनदाट असावेत. त्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय आणि अगदी पार्लरमध्ये जाऊन केसांची काळजी घेण्यापर्यंत सगळ्या गोष्टी अनेक महिला करत असतात. घरगुती उपायांपासून ते अगदी कोणी जे काही सांगेल ते सर्व करण्यासाठी तयार असतो. पण काही उपाय इतके पक्के असतात की, हे केल्यानंतर तुम्हाला घनदाट केस हे नक्की लाभतील. केसांची योग्य वाढ आणि घनदाट केस हवे असतील तर आम्ही तुम्हाला उपाय सांगणार आहोत. पार्लरच्या महागड्या ट्रिटमेंटपेक्षा तुम्ही तुमच्या नियमित शाम्पूमध्ये केवळ दोन गोष्टी समाविष्ट केल्या तर तुम्हाला तुमचे केस उत्तम राखता येतील. कोरफड जेल आणि गुलाबपाणी या दोन गोष्टींचा वापर करून तुम्हीसुद्धा अप्रतिम केस मिळवू शकता. तसंच तुमच्या केसांची हमखास वाढ होऊ शकते. यामुळे केसगळती कमीदेखील होते.**



### कोरफडचे केसांसाठी फायदे

कोरफडमध्ये आढळणारे पोषक तत्व हे केसांमध्ये मुलायमपणा राखण्यास मदत करते. तसेच केसांना लागणारे आवश्यक पोषण प्रदान करण्याचे कामही करते. त्यामुळे केस लवकर वाढतात. तसंच कोरफड जेल हे स्काल्पमधील रक्तप्रवाह वाढवून केसांना मजबूती देण्याचे काम करते. अशाप्रकारे कोरफड केसांचा विकास करण्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. कोरफड जेल हे कोंडा आणि स्काल्पमधील येणारी खाज दूर करण्यासाठीही उपयोगी ठरते. तसंच अँटीडँड्रफ गुण यामध्ये असल्याने याच्या वापराने कोंड्याची समस्या पटकन सुटते. याच गुणामुळे याचा वापर शँपू अथवा कंडिशनरमध्ये मुख्य घटक म्हणून करण्यात येतो. इतकंच नाही कोरफड जेल तुम्ही शँपूमध्ये मिक्स करून लावल्याने केसांना पोषक तत्व मिळतात. कोरफड जेलमध्ये मुख्य स्वरूपात विटामिन बी1, बी2, बी6 आणि बी12 असतात जे केसांचा विकास अधिक करण्यास मदत करतात.

## गुलाबपाण्याचे केसांसाठी होणारे फायदे

केसांसाठी गुलाबपाणीदेखील कोरफड जेलप्रमाणेच लाभदायक आहे. गुलाबपाण्यामध्ये अँटिइन्फ्लेमेटरी गुण असतात. तसंच यामध्ये अँटिफंगल प्रभावही असतो. हे सर्व फंगल संक्रमणाचा प्रभाव कमी करून कोंडा कमी करण्यासाठी उपयोगी ठरते. गुलाबपाणी एका शोधानुसार, कोंडा नियंत्रित करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. गुलाबपाण्याचा वापर केसांवर केल्याने केस लांबसडक, घनदाट आणि चमकदार राखण्यास मदत मिळते. तुम्ही तुमच्या शाम्पूमध्ये गुलाबपाणी मिक्स करून थोडा वेळ मसाज करा. केसांची गळती यामुळे कमी होण्यास मदत मिळते.

## कसे बनवावे आणि वापरावे...



एक चमचा गुलाबपाणी आणि दोन चमचे कोरफड जेल घ्या. या दोन्ही गोष्टी तुम्ही तुमच्या नेहमीच्या शँपूमध्ये मिक्स करून घ्या. केस पाण्याने भिजवा आणि केसांना हा शँपू लावा आणि व्यवस्थित मसाज करा. 2-3 मिनिट्स मसाज करा आणि मग केस कोमट पाण्याने धुवा. ज्या ज्या वेळी तुम्ही केसांना शँपू कराल तेव्हा तेव्हा तुम्ही हा प्रयोग करा. एक महिना तुम्ही याचा वापर केलात तर तुम्हाला याचा परिणाम दिसून येईल. हा उपाय नैसर्गिक असून केसांची चमक वाढविण्यासाठी आणि केसगळती कमी करण्यासाठी, तसंच केसांचा विकास होण्यासाठी याचा उपयोग होतो. तुम्हीदेखील याचा वापर करू शकता.

# गुंता केसांचा !



**केस धुतल्यानंतर अथवा झोपेतून उठल्यानंतर सर्वात पहिली त्रासदायक गोष्ट म्हणजे केसांचा होणारा गुंता. त्यातही केस जर मोठे असतील तर हा गुंता सोडविणे म्हणजे एक सर्वात मोठा टास्क आहे असंच म्हणायला हवं. केसांचा एकदा गुंता झाला की, तो सोडविणे हे महाकठीण काम. त्यातही केस कुरळे असतील तर मग दमछाक होणे नक्कीच. पण तुम्ही केस धुतल्यानंतर अथवा झोपतून उठल्यानंतर अगदी सहजरित्या हा केसांचा गुंता सोडवू शकता. केसांचा गुंता सोडविण्यासाठी आम्ही तुम्हाला ५ सोप्या टिप्स देत आहोत. तुम्ही याचा वापर करून सहजपणे केसांचा गुंता आता सोडवा. यामुळे तुमचे केसही तुटणार नाहीत आणि केसांची काळजी व्यवस्थित घेतली जाईल हे निश्चित.**

- स्टेप 1 - कंडिशनर : आपण शाम्पू केल्यानंतर केसांना कंडिशनर लावतोच. जर तुम्ही लावत नसाल तर आताच सुरू करा. कारण कंडिशनर केसांना केवळ पोषणच देत नाही तर केसांचा गुंता सोडविण्यासाठी ही सर्वात पहिली स्टेप अर्थात सर्वात पहिली पायरी आहे. तुम्ही केसांमध्ये शँपू लावल्यानंतर केसांना कंडिशनर लावा. मुळापासून कंडिशनर कधीही लाऊ नये. केवळ केसांना वरून कंडिशनर लावावे. त्यानंतर तुम्ही नेहमी लक्षात ठेवा की, केस धुतल्यानंतर गुंता व्हायला नको असेल तर कंडिशनर लावल्यावरच तुम्ही केसांमधून जाड दातांचा कंगवा फिरवा. वरून खाली केस विंचरा. कंडिशनर तुम्ही साधारण 3-4 मिनिट्स तसंच राहू द्या. त्यानंतर तुम्ही तुमचे केस पाण्याने स्वच्छ धुवा. तसंच सर्वात महत्त्वाचे म्हणजे केस धुताना अधिक गरम पाण्याचा वापर करू नका.
- स्टेप 2 - टॉवेलने सुकवणे : केस धुऊन झाल्यावर पहिले टॉवेलने पाणी तुम्ही टिपून घ्या. मग केसातील पाणी झाडून टाका आणि मग केस टॉवेलमध्ये गुंडाळून ठेवा. ५-१० मिनिट्स केस टॉवेलमध्ये तसेच राहू द्या. पण लक्षात ठेवा केस टॉवेलमध्ये अधिक घट्ट बांधू नका. त्यामुळे केस तुटण्याची शक्यता असते. त्यामुळे केस बांधताना व्यवस्थित तुम्ही अगदी हलक्या हाताने बांधा. टॉवेल घट्ट बांधून घेऊ नका. अन्यथा ओल्या केसांमुळे डोकं दुखण्याची शक्यता निर्माण होते.
- स्टेप 3 - लिव्ह इन कंडिशनर : जेव्हा केसांचा गुंता सोडविण्याची बाब असते तेव्हा तुम्ही एक लाईटवेट कंडिशनर वापरावे. कोणत्याही सीरमपेक्षा अधिक योग्य लिव्ह इन कंडिशनर असते. यासाठी तुम्ही तुम्हाला आवडेल ते लिव्ह इन कंडिशनर घ्या. हे केसांना तुटण्यापासून वाचविण्यासाठी मदत करते. तसंच ओल्या केसात लावल्याने केसांचा गुंता पटकन सोडविण्यासही मदत मिळते. त्याशिवाय लिव्ह इन कंडिशनर लावल्याने केसांना अधिक चांगली चमकही मिळते. मात्र त्वरीत तुम्ही घरच्या बाहेर जाऊ नका. कारण यावर पटकन धूळ आणि माती चिकटून बसते. त्यामुळे थोडा वेळ वाट पाहूनच तुम्ही बाहेर जा.



- स्टेप 4 - केसांना विभागा : केसांचा गुंता सोडविण्यासाठी तुम्ही कंगव्याने एकत्र केस विंचरू नका. कारण हे चुकीचे आहे. यामुळे केसांचा गुंता अधिक वाढतो. केस तुम्ही विभागून घ्या आणि मगच विंचरा. केसांना मध्ये भांग पाडा आणि मग केस विंचरले की, गुंता सोडविणे सोपे होते. तसंच केस खेचले जात नाहीत आणि तुटतही नाहीत.
- स्टेप 5 - मोठ्या दातांचा कंगवा वापरा : केसांचा गुंता सोडविण्यासाठी तुम्ही मोठ्या दातांचा कंगवा वापरा. केसांसाठी नेहमीच मोठ्या दातांचा कंगवा योग्य ठरतो. यामध्ये केस अडकून पडत नाहीत आणि गुंता पटकन सोडवला जातो. केस खालून विंचरायला पहिले सुरुवात करा आणि मग वरच्या बाजूला विंचरा. सर्व केसांचा गुंता सोडवून झाला की, पुन्हा एकदा सर्व केस व्यवस्थित विंचरून घ्या.

## शॉर्ट न्यूज

### महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण लांबविले

■ **संगमनेर :** शहरातील अकोले बाह्यवळण मार्गाने पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील गंठण दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी ओरबाडून पोबारा केल्याची घटना ताजी असतानाच काल भरदुपारी पुन्हा एकदा संगमनेर कॉलेज समोरून पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दोन तोळे सोन्याचे गंठण चोरून दोन चोरट्यांनी पोबारा केला. शोभा संजय नवले (रा. मालदाड गावठाण) दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शोभा या संगमनेर कॉलेजसमोरील कालिका स्टील जवळून पायी जात होत्या. त्याच दरम्यान दोन चोरट्यांनी दुचाकीवरून येत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण लंपास केले.

### जनजागृती व शांतता रॅलीचे आयोजन

■ **नगर :** सकल मराठा समाजाच्या वतीने येत्या १२ ऑगस्टला नगर शहरात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या संदर्भात सकल मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. रॅलीच्या दिवशी मनोज जरांगे पाटील हे शिरूर सुपा मार्गे अहमदनगर जिल्ह्याच्या प्रवेश करणार आहेत. या रॅलीसाठी मोठ्या संख्येने मराठा बांधव नगर शहरात येणार असल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बसस्थानक परिसरात केले वृक्षारोपण

■ **खर्डा :** जामखेड तालुक्यातील खर्डा येथील काही दिवसापूर्वी अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने प्रवीण अमृत होमकर यांचे दुःखद निधन झाले. खर्डा येथे वर्ग मित्रांनी त्यांच्या स्मरणार्थ खर्डा बस स्थानकामध्ये वृक्षारोपण केले. तसेच १९९२ च्या बॅचच्या वर्ग मित्रांनी एक लाख रुपये रुपयांचा निधी त्याच्या कुटुंबाला सुपूर्त करून एक आपुलकी जपली आहे. सगळ्यावेगळ्या कार्यक्रमाच्या आयोजनाचे खर्डा शहरात कौतुक केले जात आहे.

### श्री ढोकेश्वर महाविद्यालयात नवागतांचे स्वागत

■ **पारनेर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज टाकळी ढोकेश्वर येथे नवीन वर्षात प्रवेश घेतलेल्या नवागतांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात असलेल्या श्री ढोकेश्वर महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून कला, विज्ञान, वाणिज्य आणि संगणक शास्त्र या विभागात ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्या अनुषंगाने नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

### अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

■ **राहुरी :** लोकशाहीर साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती राहुरी शहरात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. सायंकाळी उत्सव समितीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची शहरातील शनीचौक येथून मिरवणूकीला सुरुवात करण्यात आली. शहरातील मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढली. मिरवणूकी दरम्यान अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व नेते मंडळींनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत मिरवणूकीचे स्वागत केले. मिरवणुकीत मुलांसह महिला, पुरुष व तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला.

# महसूल व पशुसंवर्धन पंधरवडा शासनाची प्रतिमा उंचावणारा ठरेल

■ **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास**
■ **लोकाभिमुख उपक्रमाने विभागावरील विश्वास दृढ होईल : ना.विखे**

**मुंबई : प्रतिनिधी**

**महसूल व पशुसंवर्धन विभागातर्फे राबविला जाणारा पंधरवडा हा शासनाची प्रतिमा उंचविणारा ठरणार असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले, ते महसूल व पशुसंवर्धन विभागाच्या पंधरवड्याच्या शुभारंभाच्या प्रसंगी बोलत होते. महसूल पंधरवडा व पशुसंवर्धन पंधरवडा मध्ये शासन आपल्या दारी उपक्रमाच्या धर्तीवर शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी शिबिर आयोजित करून जास्तीत जास्त लाभ द्यावा असे त्यांनी सांगितले.**




वयोश्री, लेक लाडकी, अन्नपूर्णा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण तसेच शेतकऱ्यांशी संबंधित सर्व योजनांची चांगली अंमलबजावणी करून शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करावी असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

राज्यस्तरीय महसूल दिन व महसूल पंधरवडा-२०२४ पशुसंवर्धन पंधरवडा-२०२४ शुभारंभ कार्यक्रम परिषद सभागृह, मंत्रालय येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल आणि पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महसूल पंधरवाडा व पशुसंवर्धन पंधरवाडा दोन्हीसाठी शुभेच्छा देताना आनंद होतो आहे, हे नागरिक व ग्रामीण भागातील जनतेसाठी देखील अतिशय महत्त्वाचे विभाग आहेत. जिल्हाधिकारी हे जिल्ह्यातील यंत्रणेचे प्रमुख असून सर्व विभागांसह शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी महसूल विभागाने नेहमीच अग्रेसर राहून महसूल पंधरवड्यामध्ये चांगले काम करावे.
ते पुढे म्हणाले, कृषी, आरोग्य, सिंचन, जलसंपदा, सहकार यासह अन्य सर्व विभागांना एकत्र घेऊन काम करावे. अधिकाऱ्यांनी अधिक गतीमान, परस्पर समन्वय साधून नागरिकांची कामे वेळेत करण्यासोबत जनकल्याणकारी योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून लोकाभिमूख काम करावे. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी लोकांपर्यंत जावे.
पंधरवाडा निमित्त सर्व विभाग एकत्र येऊन काम करत असले, तरी शासन नेहमीच नागरिकांसाठी २४ ७ काम करत आहे. आपण या निमित्ताने विविध योजना लोकांपर्यंत नेऊन शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करावी. पशुसंवर्धन पंधरवाडा मध्ये राज्यातील दूध भेसळीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर अतिशय कठोर काम केले जावे. भेसळ करणाऱ्यांना जरब बसेल यासाठी मोकासारखी कारवाई करावी. महसूल विभागाने सर्व यंत्रणच्या सहकार्याने दाखले व विविध योजनांचे लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अगदी गाव पातळीवर जाऊन काम करावे असे आवाहन या निमित्ताने मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केले.

शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचून सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाने महसूल पंधरवडा यशस्वी होईल. पोलीस विभागाच्या धर्तीवर महसूल विभागास देखील जिल्हा नियोजन समितीतून वाहने खरेदीचा निर्णय घेण्यात येत आहे असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

या प्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, महसूल विभागाचा नागरिकांशी जन्म दाखल्यापासून,मृत्यू दाखल्या पर्यंत संबंध येतो. यामुळे महसूल विभागाचा कारभार अधिकाधिक लोकाभिमुख व्हावा आणि महसूल विभागातील विविध शासकीय योजना व सेवा सुविधा यांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावी, लोकांमध्ये विभागाबद्धल विश्वास दृढ व्हावा यासाठी महसूल विभागाच्या वतीने महसूल दिन आणि सप्ताह साजरा केला जात होता. पण नागरिकांचा उत्फुर्त प्रतिसाद पाहता यावेळी विस्तार करून सप्ताहऐवजी पंधरवडा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या पंधरवड्यात विविध उपक्रम, शिबिरे राबवून महसूल संबधित कामे केली जातील. यात शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांसाठी दिले जाणारे दाखले, जमिनीच्या संदर्भातील रखडलेली प्रकरणे, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, वयोश्री योजना. युवांशी संवाद, सैनिकांची महसूल संबधित विविध कामे केली जातील.

पशुसंवर्धन पंधरवड्याबद्दल माहिती देताना मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, देशातील अर्थव्यवस्थेत ४.११ टक्के पशुपालन व्यवसायाचा वाटा आहे.यामुळे राज्यातील पशुपालन व्यवसाय वाढीस लागावा, आणि शेतकऱ्यांना पशुपालन हा जोडधंदा न राहता प्रमुख उत्पनाचे साधन बनावे यासाठी प्रथमच पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पंधरवडा राबविण्याचा निर्णय घेतला आहे.
यात पंचसूत्री कार्यक्रम राबवून पशुपालक यांच्यात जनजागृती करणे आणि पशुधनाची काळजी घेतली जाणार आहे. यात उच्च उत्पादक क्षमता असलेल्या वंशावळाची पैदास करणे, जनावरांचे लसीकरण, वैद्यकिय तपासणी, दूध योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणींचे निराकरण, पशुधनास सकस आहार देण्यासाठी प्रोत्साहन करणे, आणि २१ व्या पशुगणना अभियानाची जनजागृती केली जाणार असल्याची माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

सदरचा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्याचे पालकमंत्री, स्थानिक आमदार, आणि लोकप्रतिनिधी यांचा सहभाग घेतला जाणार आहे. तसेच महसूल विभागाच्या वतीने नागरिकांना विविध दाखले तात्काळ मिळावे यासाठी महाविद्यालयीन स्थरावर सेतू कार्यालये उभारण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला असल्याचे मा.मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

---

(पान १ वरून)

## मान्सून उर्वरित हंगामात जोरदार बरसणार

किंवा सप्टेंबरमध्ये तिथे 'ला निना'ची स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सप्टेंबरमध्ये देशात पाऊस अधिक पडू शकतो,' असे डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले.
मान्सूनचा पूर्वार्ध (जून, जुलै) (सरासरीच्या तुलनेत)
देशभरातील एकूण पाऊस : १०२ टक्के
राज्यातील एकूण पाऊस : ३९ टक्के जास्त
कोकण : ४२ टक्के जास्त
मध्य महाराष्ट्र : ४६ टक्के जास्त
मराठवाडा : २८ टक्के जास्त
विदर्भ : ३७ टक्के जास्त
मान्सूनचा पूर्वार्ध (जून, जुलै) (सरासरीच्या तुलनेत)
देशभरातील एकूण पाऊस : १०२ टक्के
राज्यातील एकूण पाऊस : ३९ टक्के जास्त
कोकण : ४२ टक्के जास्त
मध्य महाराष्ट्र : ४६ टक्के जास्त
मराठवाडा : २८ टक्के जास्त
विदर्भ : ३७ टक्के जास्त.

**ताम्हिणीत सर्वोच्च पाऊस**

जुलै महिन्यात देशभरात अतिशय जास्त पावसाच्या (२४ तासांत २०४.५ मिलीमीटरपेक्षा जास्त) १९३ घटना; तर जास्त पावसाच्या (२४ तासांत ११५.६ ते २०४.५ मिलीमीटर) १०३० घटनांची नोंद झाली. महाराष्ट्रातील ताम्हिणी येथे २५ जुलै रोजी नोंदला गेलेला ५६० मिलीमीटर पाऊस हा जुलैमध्ये देशातील सर्वोच्च्च पाऊस ठरला.

**पुढील चार दिवस पावसाचा अंदाज**

पश्चिम बंगालजवळ वातावरणात हवेची चक्रिय स्थिती असून, पुढील २४ तासांत तिथे कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचा अंदाज आहे. दुसरीकडे दक्षिण गुजरात ते केरळ दरम्यान किनारपट्टीला समांतर कमी दाबाचा पट्टाही (ऑफ शोअर ट्रफ) सक्रिय आहे. या स्थितीमुळे तीन ऑगस्टपर्यंत मध्य महाराष्ट्राच्या घाट क्षेत्रात आणि कोकणात काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. पाच ऑगस्टपर्यंत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात, तर चार ऑगस्टपर्यंत विदर्भात काही ठिकाणी जास्त ते अतिजास्त पाऊस होऊ शकतो, असा अंदाज आहे.

## संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे

भवन या गावातील मराठा समाजाचे दत्तात्रय पांढरे, सोमीनाथ कळम, रमेश काकडे यांच्यासह मराठा समाजातील कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला आहे.
मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवणाऱ्या मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांच्या वतीने ताब्यात घेण्यात आले आहे.
मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवणाऱ्या मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांच्या वतीने ताब्यात घेण्यात आले आहे.
मुख्यमंत्र्यांना राज्यात फिरण्याचा अधिकार नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.
मराठा समाज मुंबईला चालून जात असताना मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना वाशीमध्ये थांबवण्यात आले होते. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन आरक्षणाचे आश्वासन देण्यात आले. मात्र, तरीही मुख्यमंत्र्यांनी आश्वासन पूर्ण केले नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचा काळे झेंडे दाखवून मुख्यमंत्र्यांचा आणि या सरकारचा निषेध व्यक्त केला असल्याचे आंदोलकांनी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. त्यामुळेच मराठा समाजाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले असून एकनाथ शिंदे यांना राज्यात फिरण्याचा कोणताही नैतिक अधिकार नसल्याचा आरोप या आंदोलकांनी केला आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### माझी शतपत्रे (भाग दुसरा)

२६ ऑगस्ट २०23 च्या शनिवारी पारनेर दर्शन दैनिकात माझी शतपत्रे या लेखाचा पहिला भाग प्रकाशित झाला. आता माझ्या शतपत्रांच्या दुसऱ्या भागावरचा लेख (शतपत्रे-भाग दुसरा) प्रकाशित होत आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा मांडीत आहे. माझी शतपत्रे या पहिल्या भागासारखेच या लेखाच्या दुसऱ्या भागाचेही स्वागत होईल, अशी अपेक्षा आहे.



पारनेर दर्शन दैनिकात वाचकांच्या लेखणीतून हे सदर कार्यकारी संपादक विजय वाघमारे आणि माझ्या विचारविनिमयातून चालू झाले. त्यातच पहिल्यांदा २२ जुलै २०२२ रोजी माझे पहिलेवहिले पत्र प्रकाशित झाले. वाचकांच्या लेखणीतून या सदराचा आरंभही याच तारखेपासून झाला.
२९ ऑगस्ट २०23च्या मंगळवारी पारनेर दर्शन दैनिकात प्रकाशित झालेले माणसाला विंचू चावणे चांगले? हे माझे १०१ वे पत्र होय. 30 जुलैच्या मंगळवारी याच दैनिकात प्रकाशित झालेले भंजाळणे हे माझे पत्र २०० व्या क्रमांकाचे होय.
विशेष म्हणजे दोनतीन पत्रांचा अपवाद वगळता या सदराचे लेखन मी एकटाच करीत आलेलो आहे. या सदरात नुसती पत्रेच नव्हेत; तर माझे लेखही प्रकाशित करण्यात आलेले आहेत. डोंगराला वाजली थंडी, चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी, गोरी तोरे नैनवा कजर बिन कारे (काव्यशास्त्रीय), ऐका हो ऐका (व्यक्तिचित्रणात्मक), भाषाशैली, मथळे! मथळे!! (साहित्यिक), रक्तात न्हालेले आश्चर्य, सुसंस्कृत राजकीय नेता (संस्मरणात्मक), काय या संतांचे मानू उपकार!, विठ्ठल! विठ्ठल!! (संतसाहित्य), हम उसका दिल, उसका जिगर देखते हैं!, इवलेसे रोप लावियले द्वारी..., अण्णाभाऊंच्या साहित्याची कदर झाली पाहिजे (गुणानुवादात्मक), होळी रे होळी, माताः संस्कृतीची पाठशाळा (सांस्कृतिक), मक्खीचूस, भंजाळणे (व्युत्पत्तीशास्त्र), गरुडभरारी, प्रांजळाचे आरसे (ललित), सर्वे भवन्तु सुखिनः, ...ज़िंदगी की सहर खो रहे हैं लोग (पर्यावरणात्मक), काही ग्रंथ परीक्षणे ....असे किती तरी लेख माझ्या हातून अवतरले आहेत. भले बुरे वाचक जाणोत.
माझी पत्रे किंवा लेख वाचून काही वाचकांनी मला कधी व्हाटस् ॲपवरून, कधी फोनवरून, तर कधी प्रत्यक्ष भेटून धन्यवादही दिलेले आहेत. तनपुरेवाडी (निघोज) जि.प. प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या पहिल्या ईयत्तेतील विद्यार्थी अर्णव अंकुश सोनवणे याचा नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत अखिल महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक आला. त्याचे कौतुक म्हणून इवलेसे रोप लावियले द्वारी... या शीर्षकाचे माझे पत्र ११ जुलै २०२४ च्या गुरुवारच्या पारनेर दर्शनमध्ये प्रकाशित झाले. ते वाचून अर्णवचे वडील अंकुश सोनवणे यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहिले! वैयक्तिकरीत्या त्यांनी मला भेटण्याची इच्छाही व्यक्त केल्याचे मला एका पत्रकार मित्राने सांगितले. नंतर अंकुश सोनवणे यांनी मला वैयक्तिकरीत्या फोन करून धन्यवादही दिले. हा माझा वैयक्तिक नसून पारनेर दर्शन दैनिकाच्या पत्रकारितेचा सन्मान आहे, असे मी मानतो.
पारनेर दर्शन दैनिकाचे मुद्रक, प्रकाशक, मालक आणि संपादक देविदास आबूज तसेच कार्यकारी संपादक विजय वाघमारे यांनी या दैनिकात मला लिहिण्याची संधी दिली. मला एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ताः डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्कः 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# आता पत्रकारांनाही हवी लाडकी योजना!

## ■ पाच हजार मानधनाची मागणी ■ निघोजच्या बैठकीत ठराव

निघोज : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकरी, महिलांसाठी अनेक योजना सुरू करून शहरी व ग्रामीण जनतेला आधार देण्याचे काम केले असून लाडकी बहिण योजनेच्या धर्तीवर लाडका पत्रकार योजना सुरू करून पाच हजार रूपये मानधन देण्यात यावे असा ठराव निघोज विभागीय पत्रकार संघाच्या कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत करण्यात आला.**

मुकुंदराव निघोजकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत पत्रकारांसाठीच्या योजनेची आग्रही मागणी करण्यात आली. ग्रामीण भागातील पत्रकारांचे विकास कामांमध्ये योगदान आहे. पत्रकारीता करताना नि:स्वार्थी वृत्तीने काम करण्याचे काम होते. हे काम करताना पत्रकारांना एक रूपयाचेही मानधन मिळत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा




पवार यांनी मंत्रीमंडळ बैठकीत आपला भाउ पत्रकार ही योजना सुरू करून ग्रामीण पत्रकारांसाठी पाच हजार रूपये प्रति महिना मानधन सुरू करून पत्रकारांना दिलासा देण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला, त्यास सर्व पत्रकारांनी एकमुखाने पाठींबा देत ठराव संमत करण्यात आला.

यावेळी दत्ताजी उनवणे, भास्करराव कवाद, बाबाजी वाघमारे, संतोष इधाटे, सतिश रासकर, शिरीष शेलार, अनिल चौधरी, मंगेश पारखे, विकास शेंडकर, जयदीप कारखिले, योगेश खाडे, अविनाश भांबरे, संपत वैरागर, संदीप गाडे, सागर आतकर, आनंद भुकन, संदीप इधाटे, सचिन जाधव, जयसिंग हरेल, रोहन उनवणे आदी उपस्थित होते.

### अण्णांची भेट घेणार

ग्रामीण भागातील पत्रकारांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. अशा स्थितीमतध्ये ते आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतात. केंद्र व राज्य सरकारने पत्रकारांकडे लक्ष देण्याची आवष्यकता आहे. ग्रामीण भागात काम करताना अनेक अडचणी येतात. या बाबींचा विचार करून पत्रकारांसाठी ही योजना सुरू करणे आवष्यक आहे. लवकरच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेउन या मागणीकडे लक्ष वेधणार आहोत.

**दत्ताजी उनवणे**
ज्येष्ठ पत्रकार

# आश्रमशाळेतील चिमुकल्यांसोबत अण्णाभाऊंची जयंती

## समाजबांधवांच्या वतीने विद्यार्थ्यांना अन्नदान

निघोज :प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे जाईबाई येवले केंद्रीय आश्रम शाळेत समस्त पारनेर तालुक्यातील मातंग समाज बांधवांच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. ऑगस्ट विश्वविख्यात साहित्य सम्राट साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**



कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री.जाधव सर यांनी केले. आण्णाभाऊंचा जीवनपट त्यांनी सांगितले.त्यावेळी श्री.कृष्णा शेलार यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की साहित्यसम्राट आण्णा भाऊ मूळे शिवछत्रपतींचा पोवडा रशियात घुमला.त्यांचे कार्य महान असून प्रतिकूल परिस्थितीतून ते घडले असून .त्यांनी कुणाही पुढे हार मानली नाही मोहन साळवे व मधुकर रणदिवे यांनी आपल्या भाषणात साहीत्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या विषयी विचार माडले. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर मनोहर कनिंग्धवज ,तेजस अवचार ,शेखर अवचार, देवेंद्र अल्हाट, राहुल साळवे, सचिन पंचराष, विकास पंचराष, अविनाश साळवे ,संतोष शेलार, बाळासाहेब आपटे,संतोष साळवे, सोमनाथ वायदंडे, रामदास साळवे, किशोर जाधव, गणेश साळवे, नवनाथ शेलार, शेखर वैरागर, संभाजी साळवे, गोरख कनिंजध्वज, संतोष कनिंगध्वज आदी मान्यवर तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

त्यावेळी समाज बांधवांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अन्नदान करण्यात आले. कार्यक्रमाचे अधक्ष स्थान निघोज ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद यांनी भूषविले.अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक विठ्ठलशेठ कवाद होते. समाजबाधंवाच्या वतीनेआश्राम शाळेत अनाथ मुलांना अन्नदान देवून त्यांच्या चेहऱ्यावर हसू निर्माण करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला ,मी या कार्यक्रमाने भारावून गेलो असल्याचे शाळेचे अध्यक्ष बाबाजी येवले यांनी व्यक्त केले.विशाल साळवे यांनी नियोजन केले.सूत्रसंचालन कोल्हे सर यांनी केले.तर श्री.पवार सर यांनी आभार व्यक्त केले.

# श्रावण शॉपींग महोत्सवाचे राणीताई लंके यांच्या हस्ते उद्घघाटन

## रोटरी क्लब ऑफ नगरचा उपक्रम



नगर : प्रतिनिधी

**रोटरी क्लब ऑफ नगरच्या वतीने ३ व ४ ऑगस्ट रोजी श्रावण शॉपींग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.**

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्ष मिनल ईश्वर बोरा, मुंबईच्या देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण मंडळाच्या संचालिका तसेच महिला मंडळ शिक्षण संस्थेच्या संचालिका मिनल महेंद्र गंधे, सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्सचे संचालक ईश्वर बोरा, चैतन्य महिला बचत गटाची सहकारी पतसंस्थेच्या संचालिका तनुजा लिपाणे, हॅपी होम फर्निचरचे संचालक देवदत्त नाथ पाउलबुधे, ब्रेनबीज सोल्युशन्स लिमिटेडचे व्यवस्थापक मयुर परदेशी यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

शनिवार दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नगरच्या कोहिनुर मंगल कार्यालयात पार पडणाऱ्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्रुती बत्तीन, कल्याणी शॉपी तसेच महिला बचत गटाच्या संचालीका कल्याणी गाडळकर यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या सदस्या, पंचायत समितीच्या सदस्या तसेच जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्या म्हणून काम करताना राणीताई लंके यांनी महिलांसाठी भरीव काम केले असून महिलांसाठीच्या वैयक्तीक लाभाच्या योजना जास्तीत जास्त महिला भगिनींपर्यंत पोहचविण्यातही त्यांचे मोठे योगदान आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही राणीताई लंके यांनी भरीव योगदान दिले असून त्यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होत असल्याचे महिलांना त्यांच्या उपस्थितीची उत्सुकता आहे.

# पोखरी येथील डाक चौपाल मेळाव्यास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विविध योजनांचा लाभार्थ्यांना लाभ




पोखरी : प्रतिनिधी

**डाक विभाग व ग्रामपंचायत पोखरी यांचे संयुक्त विद्यमाने पोखरी येथे श्री रंगदास स्वामी मंदिर येथे मेळावा आयोजित केलेला होता. त्या मध्ये सर्व ग्रामस्थ व लाभार्थ्यांनी सहभाग घेतला.**

यावेळी आधार अपडेट व नवीन आधार काढणेसाठी वरिष्ठ कार्यलय यांचे पत्र व्यवहार करून तो ही कॅम्प आयोजित करणार असल्याचे सुचवण्यात आले. या कॅम्प मध्ये पोस्ट ऑफिस रिकरिंग ठेव, बचत खाते, मुदत ठेवी खाते, सुकन्या समृध्दी योजनेचे खाते, लहान बालकांचे आधार, आधार व मोबाईल लिंक, लाडकी बहीण योजना साठी व लेक लाडकी योजना साठी खाती खोलून देणेत आली. सुमारे ३०० नागरिकांनी यामध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी पोखरीच्या सरपंच श्रीमती हिराबाई पवार ,वारणवाडी सरपंच संजय काशीद ,म्हसोबा झाप सरपंच प्रकाश गाजरे, युवा कार्यकर्ते सतीश पवार, बाळासाहेब शिंदे, नामदेव करंजेकर, म्हाताजी पवार, कुंडलिक पवार, गवराम दरेकर यांनी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या सहभाग नोंदवला. अहमदनगर डाक विभागाचे सहाय्यक डाक अधीक्षक संदीप हदगल,डाक आवेक्षक पिर मोहम्मद चौगुले,प्रकाश ताजवे, महेश झावरे,, प्रतीक कदम, बबन गागरे, पल्लवी कुंभारकर, रंगनाथ शिंदे, सयाजी आग्रे व पोखरी पोस्ट मास्तर योगेश आंबेकर यांनी उपस्थित ग्रामस्थ व पदाधिकारी यांना पोस्टाच्या विविध योजनांची माहिती दिली.

# गाडीलगांवचा संकेत गाडीलकर सहयाद्री रत्न पुरस्काराचा मानकरी

## १८ ऑगस्टला पुण्यात पुरस्कार वितरण

गाडीलगांव : प्रतिनिधी



**क्रिकेट क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या गाडीलगांव येथील संकेत गाडीलकर यास राज्य शासन मान्यताप्राप्त सहयाद्री रत्न महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने सहयाद्री रत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. रविवार दि. १८ ऑगस्ट रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.**

संकेत गाडीलकर याची या पुरस्कारासाठी निवड झाल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक जाधव यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सहयाद्री रत्न पुरस्कार सोहळयामध्ये साहित्य, सामाजिक, कला, क्रीडा, सांस्कृतीक, शैक्षणिक, उद्योग, व्यवसाय, सार्वजनिक सेवा, कृषी अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तुत्वाने उत्तुंग शिखर गाठलेल्या, पैशांना महत्व प्राप्त झालेल्या जगात जनसेवेचे व्रत हाती घेतलेल्या व त्यासाठी आहोरात्र झटणाऱ्या, सेवेसाठी आपले आयुष्य व्यतीत करणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कारांनी या सोहळयात सन्मानीत करण्यात येणार आहे. उदात्त हेतूने नि: स्वार्थपणे काम करणारी माणसे सनमानित करून पाठीवर कौतुकाची थाप टाकण्याचे काम पुरस्काराच्या निमित्ताने सहयाद्री महाराष्ट्र राज्य ही संस्था करणार आहे.

महाराष्ट्र क्रिकेटमध्ये अष्टपैलू खेळाडू तसेच इतर क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन संकेत गाडीलकर यांची सस्थेच्या निवड समितीने या पुरस्कारासाठी निवड केली आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्हे, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे आहे. संकेत याची निवड झाल्याबद्दल निकटवर्तीय, ग्रामस्थ, मित्र परीवार, नातेवाईक यांच्याकडून त्याचे अभिनंदन करण्यात येऊन कौतुक करण्यात येत आहे.

# विनोद गायकवाड राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष

## दत्ता पाचपुते यांची सहाव्यांदा जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड



■ राज्य मराठी पत्रकार संघाच्या नव्या पदाधिकाऱ्यांचा प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पारनेर : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी टाकळी ढोकेश्वर येथील विनोद गायकवाड तर जिल्हाध्यक्षपदी काष्टी येथील दत्ता पाचपुते यांची सहाव्यांदा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.**


राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या अध्यक्षतेखाली काष्टी येथे पार पडलेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

या बैठकीत जिल्हाध्यक्षपदी काष्टीचे दत्ता पाचपुते यांची सहाव्यांदा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांच्या हस्ते नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पारनेर तालुका अध्यक्षपदी निघोज येथील बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका उपाध्यक्षपदी श्रीनिवास शिंदे व राम तांबे यांची निवड जाहिर करण्यात आली. दत्तात्रय पाचपुते यांचे योगदान पाहता त्यांना सहाव्यांदा जिल्हाध्यक्षपदाची संधी देण्यात येत असल्याचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा उपाध्यक्ष म्हणून विनोद गायकवाड यांच्यासह कर्जतचे लियाकत शेख यांनाही संधी देण्यात आली. यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, लतिफ राजे, जयसिंग हरेल, आनंद भुकन, सागर आतकर, अविनाश भांबरे तसेच जिल्हयातील पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष किरण जोशी तसेच जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पत्रकारांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन जोशी व पाचपुते यांनी यावेळी केले.

# महापुरूषांनी आपल्या विचारांतून समाजहित जोपासले - शिवाजी खिलारी



टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्यासह सर्वच महापुरूषनी आपल्या विचारांमधून समाजहित जोपासले असल्याचे टाकळीढोकश्वरचे मा. सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य शिवाजी खिलारी यांनी सांगितले.**

टाकळीढोकेश्वर ग्रामपंचायतमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तर लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच अरूणाताई खिलारी तसेच मा. सरपंच शिवाजी खिलारी यांनी दोन्ही महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना मा. सरपंच शिवाजी खिलारी यांनी महापुरूषांच्या कार्याचा गौरव करताना महापुरूषांची आपण सर्वानी प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी केलेले काम समाजासाठी प्रेरणदायी असून त्यांच्या विचारांतून समाजाचे हित जोपासण्याचे कार्य झाले.

सरपंच अरूणाताई खिलारी म्हणाल्या, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सांगितले की केवळ दिड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १९ कथा संग्रह, १४ लोकनाटय तसेच ११ पोवाडे व शेकडो लावण्या लिहिल्या आहेत. मराठी साहित्याला क्रांतीचा उर्जास्त्रोत देणारे लोकशाहीर म्हणून ते सुपरिचित आहेत. माणूस हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू असून त्यांचे साहित्य हे तत्कालीन काळातील वास्तव जीवनाचे प्रतिबिंब असल्याचे खिलारी यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य किशोर गायकवाड, दीपक साळवे, संकेत झावरे, राज्य मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष विनोद गायकवाड,पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, संजय झावरे, राजेंद्र अल्हाट, धोंडीभाउ झावरे, देविदास आल्हाट, भानुदास झावरे, संदीप अल्हाट, किरण आल्हाट, योव्हान गायकवाड, संतोष गायकवाड, संकेत साळवे, योगेश म्हस्कुले यांच्यासह ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# निघोजच्या पत्रकारांचे समाजासाठी योगदान

## शिवाजीराव जाधव यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**निघोज व परिसरातील पत्रकारांनी विविध सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवून समाजातील विविध प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका घेतल्याचे प्रतिपादन देवीभोयरे येथील अंबिका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तसेच आदर्श ग्रामीण विकास प्रतिष्ठाण शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांनी केले.**



■ पारनेर तालुका पत्रकार संघाच्या निघोज येथील विभागीय कार्यालयात अंबिका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा आदश्र ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

जाधव यांचा शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी निघोज येथील पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात त्यांनी दिलेल्या सदिच्छा भेटीप्रसंगी सत्कार करण्यात आला, त्यावेळी जाधव यांनी पत्रकारांच्या योगदानाचे कौतुक केले. पारनेर तालुका फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी जयसिंग हरेल यांच्या हस्ते तसेच तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना जाधव म्हणाले, समाजाच्या विविध प्रश्नांवर निघोज परिसरातील पत्रकारांनी आवाज उठवून सामान्य माणसाला न्याय मिळवून दिला. यापुढील काळातही पत्रकारांकडून समाजाच्या विविध प्रश्नांवर आवाज उठविला जाईल असा विश्वास जाधव यांनी व्यक्त केला. निघोज परिसरातील पत्रकारांचे काम लोकाभिमुख आहे. त्याचा आदर्श इतर पत्रकारांनी घ्यावा असे आवाहन जाधव यांनी केले.

यावेळी जगदंबा देवीचे पुजारी भानुदास केदारी, पप्पू साळवे, मळगंगा देवस्थानचे उपव्यवस्थापक रोहन उनवणे आदी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com